-1-

परिशिष्ट "ब"

"बहुजन हिताय बहुजन सुखाय नागरीक बहुउद्देशिय कल्याणकारी संस्था"
महादुला (कोराडी)ता. कामठी जि.नागपुर

– ज्ञापन –

(मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशन.)

1) संस्थेचे नांव :–'बहुजन हिताय बहुजन सुखाय नागरीक बहुउद्देशिय कल्याणकारी संस्था' महादुला (कोराडी)ता. कामठी जि.नागपुर

2) संस्थेचे कार्यालय :– या संस्थेचे कार्यालय – द्वारा,/ भिमराव पा. चंद्रिकेश्वर यांचे महादुला (कोराडी)ता. कामठी जि.नागपुर

3) संस्थेचे उद्देश :– या संस्थेचे उद्देश खालीलप्रमाणे : –

1. केंद्र व राज्य शासनाच्या अंतर्गत लोकांना संस्थेच्या माध्यमातून समाजाच्या लोकांच्या शिक्षणाच्या प्रसाराकरीता बालमंदिर, कॉन्व्हेंट,पाठशाला,विद्यालय,महाविद्यालय तसेच एम.एड.व बी.एड., बी.पी.एड, महाविद्यालय,तसेच आरोग्य शिक्षण संस्था,वैद्यकिय महाविद्यालय, अभियांत्रिकी महाविद्यालय,वाचनालय,शिशु संगोपन केंद्र,नाईट स्कूल,मॉटेसरी,प्रयोगशाळा संबंधित विद्यालय स्थापन करणे व चालविणे.

2. लोकांना संस्थेचे वतिने व्याख्यानमाला,परिसंवाद,गुहउधोग, चालविणे,संगणकप्रशिक्षण संस्था स्थापन करणे,कॅम्पुटर प्रशिक्षण देणे,नविन तांत्रीक शिक्षण अंमलांत आणने,गरीब निरात्रित होतकरु विध्यार्थीना शिष्यवृक्ती देणे,गणेवेश पाठयपुस्तके मोफत वाटप करणे,केद्र व राज्य शासनाच्या उपहार योजना, कल्याणकारी योजना राबविणे,जसे, पाणलोट,पर्यावरण सामाजिक आरोग्य युवक कल्याणकारी योजना राबविणे,

3. युवक युवतीना तांत्रिक शिक्षक व प्रशिक्षण संस्था, संगणक, टंकलेखन प्रशिक्षण संस्था औद्योगिक शिक्षण संस्था, मुलांना व्यवसाय प्रशिक्षण देणे,महिला नर्सीग ट्रेनिंग शाळा,ग्रामिण व शहरी भागात ॲम्बुलस सेवा,आरोग्य सेवा भावी संस्था स्थापीत करणे व चालविणे.

4. ग्रामिण व शहरी भागातील गोर गरीब मुला–मुलीना गणवेशांचे वाटप करणे,नैसगिक आपीतकालीन लोकांना मदत करणे,वृक्षा रोपन कार्यक्रम राबविणे,ग्राम स्वच्छता अभियान राबविणे,

5. ग्रामीण तसेच शहरी विभागातील लोकांच्या विकासाकरीता ब्युटी पार्लर ॲन्ड कल्चर व शिक्षण शिवणकला व हस्तकला प्रशिक्षण,फोटोग्राफी, इंटरनेट प्रशिक्षण केद्र, व्हिडीओग्राफी,डि.जे. संगितॲकॅडमी, संगित क्लासेस, फॅन्सन डिझाईन,भरतकाम प्रशिक्षण संस्था स्थापन करणे, टिव्हिचॅनल लॉचिंग,चर्चासत्र, स्वयंरोजगार रोजगार योजने अंतर्गत प्रशिक्षण देणे.

6. महिला प्राथमिक शाळा,विद्यालय,महाविद्यालय,प्रत्यक्ष शाळेत भेट घेवुन विध्यार्थाला चा विकास करणे,महिला वस्तीगृहे,आश्रमशाळा स्थापन करणे व समाजाचे लग्न विवाह संबधी परीचय मेळावे घणे,

7. ग्रामिण रूग्णालय,आरोग्य विषयकसल्ला व मार्गदर्शन देणे, बालसंगोपन कुटुंबकल्याण विषयक मार्गदर्शन केंद्र आयोजित करणे,साथरोग नियंत्रण शिक्षण देणे. महिला,बालके व वृध्दांना प्रत्यक्ष आरोग्य सेवा देणे, मार्गदर्शन, धर्मार्थ दवाखाना स्थापन करणे, शस्त्रकिया शिबीरांचे आयोजन जसे मोतीबिंदू, कुटुंब कल्याण इत्यादी,रोगनिदान शिबीरांचे आयोजन करणे,सुतिकागृह, प्रथमोपचार केंद्र प्रस्थापीत करणे,

8. सांस्कृतिक कला केन्द्र स्थापन करणे, युवक युवतीमध्ये राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय विविध कलांचे व प्रशिक्षण देणे जसे गायन, वादन, नृत्य, अध्यात्मिक भजन व सांस्कृतिक कार्यक्रम, नाटक, इ.,कला,उदयोन्मूख मुलामूलींच्या सुप्त गुणांचा विकास करून त्यांना प्रोत्साहित करणे, स्वच्छता अभियान,आदर्श गांव योजना राबविणे. दुर्गाउत्सव.गणेशउत्सव.शारदाउत्सव. या सारखे सार्वजनिक कार्यकम राबविणे.

9. केद्र व राज्य शासनाचे योजना राबविणे, जसे :– अंध, मुक–बधीर, अपंग मतीमंद इ. लोकांच्या कल्याणहेतू विविध प्रशिक्षण केन्द्र व पुनर्वसन केन्द्र प्रस्थापित करणे व राबविणे, वृध्दाश्रम,प्रौढ शिक्षण, विधवाश्रम स्थापन करणे, गरिब, निराधार,आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांना निशुल्क पुस्तके वितरित करणे तसेच शिक्षण देवून त्यांना सहाय्य प्रदान करणे आणि व्यवसनमुक्ती केन्द्र स्थापन करणे, अंधश्रध्दा, हुंडा, नैसर्गिक आपत्ती व पुराण काळातील वस्तुचे प्रदर्शण करणे,

10. लोकांना ~~संस्थे मार्फत अल्प बचत गट प्रशिक्षण देणे, महिला बचत गट योजना राबविणे.~~समाज मंदीर बांधणे.बाहेरून येणारे लोकांसाठी धर्मशाळा काढणे. मंगलकार्य बांधणे.थोर पुरूषाची जयंती साजरे करणे, इत्यादि.

4 संस्थेचे नांव :– ''बहुजन हिताय बहुजन सुखाय नागरीक बहुउद्देशिय कल्याणकारी संस्था''महादुला (कोराडी) ता. कामठी जि.नागपुर या संस्थेचे नियमावलीप्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेची व्यवस्था वा कारभार सोपविण्यांत आलेला आहे. अशा पहिल्या कार्यकारी मंडळाच्या सभासदांची संपूर्ण नांव व पत्ते, हुद्ये, वय, व्यवसाय आणि राष्ट्रीयत्वय खालील प्रमाणे आहे.

| अ | सभासदाचे नाव | पत्ता | पद | वय | व्यवसाय | राष्टीयत्व |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री. भिमराव पाडुरंग चंद्रशेखर | 169,शिवाजी नगर महादुला (कोराडी) ता.कामठी जि.नागपुर | अध्यक्ष | 49 | ठेकेदार | भारतीय |
| 2 | श्री. रविंन्द्र केशवराव ठाकरे | 34/1,कोराडी कॉलनी महादुला (कोराडी) ता.कामठी जि.नागपुर | उपाध्याक्ष | 26 | कामधंदा | भारतीय |
| 3 | श्री. राष्ट्गण भिमराव चंद्रशेखर | 169,शिवाजी नगर महादुला (कोराडी) ता.कामठी जि.नागपुर | सचिव | 24 | कामधंदा | भारतीय |
| 4 | श्री. रोशन देवानंद इंदुरकर | जय भिम नगर महादुला (कोराडी) ता.कामठी जि.नागपुर | सहसचिव | 24 | शिक्षण | भारतीय |
| 5 | श्री. भुषण भिमराव चंद्रशेखर | शिवाजी नगर महादुला (कोराडी) ता.कामठी जि.नागपुर | कोषाध्याक्ष | 25 | कामधंदा | भारतीय |
| 6 | श्री. रसुल अजिजू खान | नारा,नारानारी रोड नागपुर | सभासद | 30 | कामधंदा | भारतीय |
| 7 | श्री. अंबादास दामोदर चंद्रशेखर | जय भिम नगर मेन रोड कोराडी ता. कामठी जि.नागपुर | सभासद | 25 | शिक्षण | भारतीय |

—3—

आम्ही खालील सहया करणारे "बहुजन हिताय बहुजन सुखाय नागरीक बहुउद्देशिय कल्याणकारी संस्था"महादुला (कोराडी) ता. कामठी जि.नागपुर चे सदस्य जाहिर करतो की, संस्था नोंदणी अधिनियम 1860 अन्वये अभिप्रेत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने एकत्र येवून "बहुजन हिताय बहुजन सुखाय नागरीक बहुउद्देशिय कल्याणकारी संस्था"महादुला (कोराडी) ता. कामठी जि.नागपुर आज दिनांक / २२ /०८ /2009 रोजी स्थापन केली असून ही संस्था नोंदणी अधिनियम 1860 अन्वये नोंदणी करण्यासाठी या विधान पत्रावर सहया केलेल्या आहेत.

| अ | सभासदाचे नाव | पत्ता | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| 1 | श्री. भिमराव पाडुरंग चंद्रशेखर | 169,शिवाजी नगर महादुला (कोराडी) ता.कामठी जि. नागपुर | [signature] |
| 2 | श्री. रविंन्द्र केशवराव ठाकरे | 34 / 1,कोराडी कॉलनी महादुला (कोराडी) ता.कामठी जि.नागपुर | [signature] |
| 3 | श्री. राष्ट्गण भिमराव चंद्रशेखर | 169,शिवाजी नगर महादुला (कोराडी) ता.कामठी जि. नागपुर | [signature] |
| 4 | श्री. रोशन देवानंद इंदुरकर | जय भिम नगर महादुला (कोराडी) ता.कामठी जि. नागपुर | [signature] |
| 5 | श्री. भुषण भिमराव चंद्रशेखर | शिवाजी नगर महादुला (कोराडी) ता.कामठी जि. नागपुर | [signature] |
| 6 | श्री. रसुल अजिज खान | नारा,नारानारी रोड नागपुर | रसुल खान |
| 7 | श्री. अंबादास दामोदर चंद्रशेखर | जय भिम नगर मेन रोड कोराडी ता. कामठी जि. नागपुर | [signature] |

दिनांक: २२/०८/२००९
स्थळ :– नागपुर

वरील सहया करणारे यांना मी ओळखतो व त्यांनी माझ्या समक्ष या विधान पत्रावर सहया केलेल्या आहेत.

[signature] 11/09

वकिल किंवा दंडाधिकारी, / वकील / नोटारी,

O. N. KAMBLE
B. Com , LL. B.
ADVOCATE

Certified To Be
Xerox True Copy
[signature] 2/6/10
Superintendent
Public Trusts Registration Office
Nagpur Region, Nagpur.

XEROX By [signature] 2/6/10

JOINT CHARITY COMMISSIONER M.S. NAGPUR

परिशिष्ट "क"

"बहुजन हिताय बहुजन सुखाय नागरीक बहुउद्देशिय कल्याणकारी संस्था"
महादुला (कोराडी)ता. कामठी जि.नागपुर

नियम व नियमावली.

1. नियमावलीतील संदर्भिय शब्दांची व्याख्या :–

संस्था म्हणजे :– "बहुजन हिताय बहुजन सुखाय नागरीक बहुउद्देशिय कल्याणकारी संस्था" महादुला (कोराडी) ता. कामठी जि.नागपुर ही संस्था समजण्यात येईल,

अध्यक्ष म्हणजे :– "बहुजन हिताय बहुजन सुखाय नागरीक बहुउद्देशिय कल्याणकारी संस्था" महादुला (कोराडी) ता. कामठी जि.नागपुर या संस्थेचा अध्यक्ष समजण्यांत येईल.

उपाध्यक्ष म्हणजे :– "बहुजन हिताय बहुजन सुखाय नागरीक बहुउद्देशिय कल्याणकारी संस्था" महादुला (कोराडी) ता.कामठी जि.नागपुर या संस्थेचा उपाध्यक्ष समजण्यांत येईल.

सचिव म्हणजे :–"बहुजन हिताय बहुजन सुखाय नागरीक बहुउद्देशिय कल्याणकारी संस्था" महादुला (कोराडी) ता. कामठी जि.नागपुर या संस्थेचा सचिव समजण्यांत येईल.

सहसचिव म्हणजे :–"बहुजन हिताय बहुजन सुखाय नागरीक बहुउद्देशिय कल्याणकारी संस्था" महादुला (कोराडी) ता.कामठी जि.नागपुर या संस्थेचा सहसचिव समजण्यांत येईल.

कोषाध्यक्ष म्हणजे :– "बहुजन हिताय बहुजन सुखाय नागरीक बहुउद्देशिय कल्याणकारी संस्था" महादुला (कोराडी) ता. कामठी जि.नागपुर या संस्थेचा कोषाध्यक्ष समजण्यांत येईल.

सदस्य म्हणजे :– "बहुजन हिताय बहुजन सुखाय नागरीक बहुउद्देशिय कल्याणकारी संस्था" महादुला (कोराडी) ता. कामठी जि.नागपुर या संस्थेचा सदस्य समजण्यांत येईल.

2. **कार्यक्षेत्र** :– या संस्थेचे कार्यक्षेत्र संपूर्ण भारतभर मर्यादीत राहिल,

3. **हिशोबाचे वर्ष** :– हिशोबाचे वर्ष 01 एप्रिल ते 31 मार्च असे राहील.

4. **सभासद व त्याची नोंदणीची पध्दत** :–

कोणत्याही भारतीय व्यक्तिस 21 वर्षे पूर्ण झाल्यावर या संस्थेचे सभासद होता येईल. त्याकरीता त्यांना संस्थेकडे नोदणी सभासद शुल्कासह भरून अर्ज करावा लागेल आणि त्या आलेल्या अर्जाचा विचार करून कार्यकारी मंडळाच्या संमतीने सभासद होता येईल. व सभासद बहाल करण्यात यईल,

5. **सभासदांचे प्रकार** :–

अ) सर्व साधारण सभासद – सर्व साधारण सभासद होण्याकरीता रू 501/– देवून वार्षिक. सभासद होता येईल,

ब) आजीवन सभासद – फी रूपये 1001 /– वर्गणी देवून आजीवन सभासद होता येईल,

**सभासदत्व रद्द होणे :-**

सभासद शुल्क बाकी असल्यास सभेला सतत तीनदा गैरहजर राहिल्यास, संस्थेच्या विरोधात गैरकृत्य केल्यास, दिवाळखोर, शासकीय गुन्हयात दंड झालेल्या इसमाचे सभासदत्व रद्द करण्याचा निर्णय कार्यकारी मंडळाच्या 2/3 मताने घेवून त्याचे सभासदत्व रद्द करण्यात येईल.

7. **सर्व साधारण सभा व तिचे अधिकार आणि कार्य :-**

सर्व साधारण सभा वर्षातून कमीत कमी एक वेळ घेण्यात येईल. ही सभा संस्थेची सर्वश्रेष्ठ व शेवटचा निर्णय देणारी सभा म्हणून समजली जाईल.हया सभेत सर्व सभासद भाग घेवू शकतील. कार्यकारी संस्थेने अंदाजपत्रक तयार करणे,संस्थेच्या हितसंबंधानी नविन योजना राबविणे.

8. **सर्व साधारण सभेची सुचना व गणसंख्या :-**

कोणत्याही सभेचा कोरम पूर्ण होण्याकरीता 2/3 सभासद सभेला उपस्थित असणे आवश्यक राहील.तहकूब केलेली सभा उपस्थित सभासदांमध्ये त्याच ठिकाणी व त्याच दिवशी अर्ध्या तासांनी घेण्यात येईल.

9. **विशेष सर्वसाधारण सभा व तिचे कार्य :-**

आवश्यकते नुसार संस्थेचा सर्व सभासदांनी मागणी केल्यास विशेष सर्वसाधारण सभा घेण्यात येईल.या सभेची सुचना 7 दिवसा अगोदर नोटीस बुकात सही घेवून अथवा रजिस्टर्ड पोष्टाने दिली जाईल व तिचा कोरम 2/3 राहील.

10. **संस्थेचे कार्यकारी मंडळ पदाधिकारी यांची रचना :-** संस्थेच्या कार्यकारी मंडळात एकूण 07 सभासद राहतील. ज्यात खालील प्रमाणे पदाधिका-यांची रचना राहील.

अध्यक्ष – 1, उपाध्यक्ष – 2, सचिव –1, सहसचिव – 1, कोषाध्यक्ष – 1 व सदस्य – 2 असे एकूण 07 सभासद राहतील.

11. **कार्यकारी मंडळाचा कार्यकाल :-**

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल दर पांच वर्षांचा राहील व कार्यकारी मंडळाची निवडणूक दर पांच वर्षानंतर गुप्त मतदान पध्दतीने सर्व साधारण सभेत सभासदांच्या बहुमताने घेण्यात येईल.

12. **कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :-**

अ. अध्यक्ष :- संस्थेचे कामकाज चालविणे व संस्थेच्या हितसंबंधाने योग्य ते आदेश देणे, संस्थेच्या कारभारावर व त्यांच्या शाखेवर नियंत्रण ठेवणे, सर्व साधारण सभा आयोजित करणे, विनंती सभेचे आयोजन करणे.

ब, उपाध्यक्ष :- अध्यक्षांचे गैर हजेरीत अध्यक्षांचे दोघांनी कार्य करणे,व संस्थेच्या कार्यात योग्य ती मदत करणे,

क, सचिव :- कार्यकारी मंडळाची रचना करणे, सभा बोलविणे, संस्थेचा पत्रव्यवहार करणे, तकारीचे निवारण करणे, संस्थेच्या दृष्टीने आवश्यक ते कोर्ट-कचेरीचे काम करणे, वार्षिक हिशेबाचे पत्रक तयार करून सर्वसाधारण सभे समोर ठेवणे, रोजचे हिशेब पाहून त्यावर सहया करणे, खर्चाचे बिल मंजूर करणे, सेवकांवर देखरेख ठेवणे, त्यांच्या अडीअडचणी पासून त्यांना

आवश्यक ते दमत करणे संस्थेच्या दृष्टीने मालमत्तेवर देखरेख ठेवणे, ठरावाप्रमाणे मंजूर झालेले ठराव अमलात आणणे, संस्थेच्या दृष्टीने हितावह असलेले इतर कोणतेही काम पाहणे.

ड कोषाध्यक्ष :– संस्थेचे हिशोब तपासणे, संस्थेच्या आर्थिक् गोष्टींची माहिती ठेवणे, तसेच आर्थिक परिस्थितीची जाणीव सभासदांना देणे व संस्थेच्या विकासाकरीता प्रयत्न करणे, बॅंकेत संयुक्त खाते असल्यास पैसे काढण्याचा व्यवहार करणे.

इ, सहसचिव :– सचिवांचे गैरहजेरीत सचिवाचे काम पाहणे.

फ, सदस्य :– संस्थेच्या सर्व सभासदांना उपस्थित राहून संस्थेच्या हितार्थ प्रयत्न करणे व निवडणुकीत भाग घेणे.

13. **कार्यकारी मंडळाची सभा व मागणीची सभा :–**

कार्यकारी मंडळाची सभासद तिन महिण्यात एकदा व वर्शातून चार वेळा घेण्यात येईल. 2/3 सभासदांनी सभेची मागणी केल्यास अध्यक्षांनी 10 दिवसाच्या आत सभा आयोजित केली पाहिजे. त्या सभेची सुचना सात दिवसा अगोदर नोटीसाद्वारे नोटीस बुकात सही घेवून 4 दिवसापूर्वी दिल्या जाईल. अध्यक्षांनी किंवा सचिवांनी सभा आयोजित न केल्यास त्या मागणी केलेल्या सभासदांच्या सहीने नोटीस काढून ती सभा आयोजित केली जाईल व या सभेला घेतलेले निर्णय त्या मंडळावर बंधनकारक राहील.

14. **कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या :–**

कार्यकारी मंडळाच्या सभेची सात दिवसा अगोदर रजिष्टर्ड नोटीसाद्वारे दिल्या जाईल व त्याकरीता 2/3 सभेचा कोरम आवश्यक राहील.

15. **कार्यकारी मंडळाचे निवडणूकीचे नियम :–**

ज्या सभासदांकडे संस्थेची कोणत्याही प्रकारची मालमत्ता किंवा रक्कम देणे बाकी असल्यास त्या सभासदाला निवडणूकीत भाग घेता येणार नाही. तसेच त्याला मतदान करण्याचा किंवा उभे राहण्याचा अधिकार राहणार नाही. निवडणूक सर्व साधरण सभेत गुप्त मतदान पध्दतीने घेण्यात येईल.

16. **कार्यकारी मंडळात रिक्त पद भरण्याबाबत :–**

कोणत्याही कारणास्तव कार्यकारी मंडळातील एखादी रिक्त जागा झाल्यास त्या जागी नविन सभासद घेण्याचा अधिकार किंवा ती जागा भरण्याचा अधिकार कार्यकारी मंडळाचा राहीन.

17. **कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :–**

कार्यकारी मंडळाचे वर्षातून कमीत कमी 4 वेळा सभा घेणे आवश्यक राहील. सर्वसाधारण सभेत मंजूर झालेल्या ठरावाची पूर्तता करणे, संस्थेच्या मालमत्तेवर व कार्यावर नियंत्रण ठेवणे, किरकोळ नियम व उपसमित्या स्थापन करणे, संस्थेच्या उद्देशाप्रमाणे कार्य वाढविण्याकरीता प्रयत्न करणे.

18. **संस्थेच्या निधी व मिळकत विनियोग :–**

सभासद फी,वर्गणी,चॅरीटी शो,उपहार योजना अंर्तगत होणारे उत्पन्न, अनुदान,दोन कार्यक्रमाद्वारे मिळणारे उत्पन्न,खर्च वजा जाता राहिलेली शिल्लक संस्थेची मिळकत राहील व तिचा विनियोग संस्थेच्या उद्देश पूर्तीसाठी करण्यात येईल.

19. **उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतूद** :– टक्केवारी प्रमाणे –

1. सामाजिक उद्देशांवर 20 प्रतिशत
2. शैक्षणिक उद्देशांवर 40 प्रतिशत
3. वैद्यकिय व किडा प्रशिक्षण उद्देशांवर 20 प्रतिशत
4. राष्ट्रीय कार्यक्रम उत्सव, जयंत्या उद्देशांवर 20 प्रतिशत

20. **कर्ज किंवा ठेवी यासंबंधी तरतूद** :–

संस्थेला,संस्थेच्या आवश्यक असल्यास कोणत्याही व्यक्ती अथवा सभासदापासून कर्ज घेता येईल व ठेवी स्विकारता येईल. मे.धर्मादाय सह–आयुक्त. नागपूर यांची पूर्व परवानगी घ्यावी लागेल.

21. **स्थावर मालमत्ता खरेदी–विक्री करणे बाबतची तरतुद** :–

संस्थेला संस्थेच्या आवश्यक कामाकरीता अनावश्यक मालमत्ता विकता येईल व विक्री पूर्वी मे. धर्मदाय सह–आयुक्त, नागपूर यांची पूर्व परवानगी घ्यावी लागेल.

22. **सभासदांची यादी** :– 1860 चें संस्था नोंदणी अधिनियम नुसार संस्थेचे जे सभासद असतील त्यांची 1 यादी 1971 चे संस्था अधिनियम 15 प्रमाणे अनुसूची क. 1, 2 व 6 च्या नमुण्यात ठेवण्यत येईल.

23. **बॅक खाते** :–

संस्थेची शिल्लक रक्कम संस्थेच्या नावाने कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा सरकारमान्य बॅकेत ठेवण्यांत येईल. रक्कम अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष यांच्या तिंघापैकी दोघाच्या संयुक्त सहिने काढण्यात येईल.

24. **नियम आणि नियमावलीतील बदल करण्याबाबतची तरतुद** :–

नियम व नियमावलीत बदल करावयाचा असल्यास 3/5 सभासदांच्या बहुमताने मंजूर झाल्यावर नियम व नियमावलीत बदल करण्यांत येईल. सोसायटी रजि.ॲक्ट 1860 अधिनियम कलम 12 प्रमाणे कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

25. **संस्थेचे नांवात व उद्देशात बदल करण्याची तरतुद** :–

संस्थेचे नांवात व उद्देशात बदल करावयाचे असल्यास किंवा दोन संस्थेचे विलीनीकरण करावयाचे असल्यास 1860 चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम 12 व 12 (अ) प्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल.

26. **विसर्जन** :–

संस्थेचे कार्य बंद करावयाचे किंवा विसर्जन करावयाचे असल्यास 3/5 सभासदांचे बहुमताने ठराव मंजूर करावा लागेल. संस्थेची शिल्लक रक्कम व इतर संस्थेला दान म्हणून देण्यात येईल. सोसायटी रजि.ॲक्ट 1860 चे कलम 13 व 14 प्रमाणे संस्थेच्या विसर्जनाची कार्यवाही पूर्ण करावी लागेल.

## दा ख ला

प्रमाणित करण्यात येते की ''बहुजन हिताय बहुजन सुखाय नागरीक बहुउद्देशिय कल्याणकारी संस्था'' महादुला (कोराडी) ता. कामठी जि.नागपुर या संस्थेच्या नियम व नियमावलीची सत्यप्रत आहे

| अक्र.पदाधिकारी यांचे नांव | हुद्दा | सही |
|---|---|---|
| 1. श्री. भिमराव पाडुरंग चंद्रशेखर | अध्यक्ष | भिमराव चंद्रशेखर |
| 2. श्री. रविंद्र केशवराव ठाकरे | उपाध्यक्ष | Thakare |
| 3. श्री. राष्ट्रगण भिमराव चंद्रशेखर | सचिव | [signature] |

दिनांक १२/०१/०९
स्थळ- नागपूर

JOINT CHARITY COMMISSIONER ... NAGPUR

XEROX By ... 2/6/10

Certified To Be
Xerox True Copy
2/6/10
Superintendent
Public Trusts Registration Office
Nagpur Region, Nagpur.